Lokneta News - लोकनेता न्युज

महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड लोकनेता

मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

प्रतिनिधी नेमणूक सुरु आहे
Epaper: www.dainiklokneta.in/
दैनिक लोकनेता
दैनिक लोकनेता या दैनिकासाठी संपूर्ण महाराष्ट्राभर प्रतिनिधी नेमणूक सुरू आहे तरी इच्छुकांनी खालील इमेल किंवा नंबर वरती संपर्क साधावा. पात्र उमेदवारांना योग्य पदावर संधी देण्यात येईल.
मुख्य कार्यालय: मिरकाळा ता. गेवराई जि.बीड 7046383112
dnyaneshmofficial@gmail.com 7499615933

शनिवार दि.१८ एप्रिल २०२६ RNI-MAHMAR/2023/89402 Email : dnyaneshmofficial@gmail.com वर्ष : ०३ अंक : २४४ किंमत २ रुपये 7499615933

# छत्रपती संभाजीनगर महामार्गावर भीषण अपघात

## अशोक खरात यांच्या शिवनिका ट्रस्टचे उपाध्यक्ष जितेंद्र शेळके यांचे अपघाती निधन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

दि १७:-छत्रपती संभाजीनगर: समृद्धी महामार्गावर भीषण अपघात झाला आहे. संभाजीनगरहून शिर्डीच्या दिशेने जात असताना धोत्रे गावाजवळ उभ्या असलेल्या कंटेनरला कारने पाठीमागून भीषण धडक दिली. या भीषण अपघातात अशोक खरातच्या 'शिवनिका ट्रस्ट'चे उपाध्यक्ष आणि खरात याचे अत्यंत निकटवर्तीय जितेंद्र शेळके यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ते संभाजी नगरहून शिर्डीला जात असताना समृध्दी महामार्गावरती त्यांच्या कारचा अपघात झाल्याची माहिती आहे.कंटेनरखाली घुसली कार

मिळालेल्या माहितीनुसार, शेळके आपल्या कुटुंबासह कारने प्रवास करत होते. धोत्रे गावाजवळ रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका कंटेनरचा अंदाज न आल्याने त्यांची कार थेट कंटेनरच्या मागील भागात घुसली. ही धडक इतकी भीषण होती की, कारचा चक्काचूर झाला असून जितेंद्र शेळके यांचा जागीच मृत्यू झाला आहे. त्यांच्या कुटुंबीयांची प्रकृती चिंताजनक



या अपघातात जितेंद्र शेळके यांचा मुलगा आणि पत्नी गंभीर जखमी झाले आहेत. अपघातानंतर मुलाला तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मात्र, त्यांची पत्नी बराच वेळ कारमध्ये अडकलेली होती, त्यांना बाहेर काढण्याचे शर्थीचे प्रयत्न प्रशासनाकडून सुरू होते.

**खरातचा विश्वासू सहकारी**

जितेंद्र शेळके हे गेल्या काही दिवसांपासून लैंगिक शोषण आणि अनेक बड्या नेत्यांना, अधिकाऱ्यांना लुबाडल्याने चर्चेत आलेल्या अशोक खरातचे अत्यंत विश्वासू मानले जात होते. खरात याच्या 'शिवनिका ट्रस्ट'चे ते उपाध्यक्ष म्हणून काम पाहत होते. याशिवाय, शेळके यांच्या मालकीच्या लॉन्समध्येही खरात याची भागीदारी असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, गेल्या काही दिवसांपासून खरातला अटक झाल्यापासून जितेंद्र शेळके मोठ्या मानसिक तणावाखाली होते, अशी माहिती समोर येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एका बाजुला उभ्या कंटेनरला कारची पाठीमागून धडक दिली असल्याची माहिती आहे. कार थेट कंटेनरखाली घुसली आहे. या अपघातात जितेंद्र शेळकेंचा मृत्यू तर पत्नी आणी मुलगा गंभीर जखमी झाले आहेत. जखमी मुलाला उपचारासाठी रुग्णालयात केले दाखल आहे. पत्नी अजूनही गाडीत अडकली असल्याची माहिती मिळत आहे.



# बिनविरोध निवडीचा मान,वाढदिवसाचा आनंद

## कडा ग्रामपंचायतीत सन्मान सोहळा उत्साहात संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

कडा ग्रामपंचायत कार्यालय, वार्ड क्रमांक एक मधून सौ. सपना योगेश भंडारी यांची बिनविरोध निवड झाल्याने परिसरात समाधानाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर त्यांच्या यशाचा गौरव करतानाच श्री.योगेश सुमतीलाल भंडारी तसेच वटणवाडीचे युवा कार्यकर्ते किरण दादा शिनगिरे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला.यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते तिन्ही व्यक्तींचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला स्थानिक पातळीवरील अनेक मान्यवर व कार्यकर्त्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. कार्यक्रमातील मान्यवर उपस्थिती : सभापती रमजान शेठ तांबोळी सरपंच युवराज पाटील संचालक रामशेठ मधुरकर श्री सतीश (शेठ) धस,पत्रकार अण्णासाहेब साबळे,श्री भगवान



दादा शिंनगिरे,श्री तावरे साहेब सन्मान सोहळ्याचे,बिनविरोध निवडीबद्दल सौ.भंडारी यांचे विशेष कौतुक सामाजिक कार्यातील योगदानासाठी योगेश भंडारी यांचा गौरव युवा नेतृत्व व कार्यकर्तृत्वासाठी किरण दादा शिनगिरे यांचा सत्कार वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव व आनंदोत्सव या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून सौ. भंडारी यांच्या निवडीमुळे गावाच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. तसेच युवा कार्यकर्त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांनापुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचा समारोप आनंदमय वातावरणात पार पडला असून, ग्रामस्थांमध्ये एकात्मता व उत्साहाचे दर्शन घडले.

# चिमटा धरणाचे कार्यालय सुरू करा नाहीतर अंदोलन करणार विक्रम दुलसींग जाधव यांच्या इशारा

## धरणाच्या कामामुळे नागरिकांना होतोय त्रास

लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीक्षेत्र माहूर । प्रतिनिधी**

किनवट माहूर सह विदभार्तील अनेक गावे विस्थापित करणाऱ्या खंबाळा येथील निम्न पैनगंगा प्रकल्प उर्फ चिमटा धरणाच्या कामामुळे नागरिकांना त्रास होत असून बुडीत क्षेत्रात येणाऱ्या गावांच्या खरेदी विक्रीत अडचणी येत असल्याने चिमटा धरणाचे कार्यालय माहूरला सुरू करावे, अशी मागणी धरणग्रस्तातून होत आहे.अनेक वर्षांपूर्वी मंजूर करण्यात आलेल्या चिमटा धरणाचे काम जोरात सुरू करण्यात आले आहे. यामुळे येथील नागरिकांना धुळीचा आवाजाचा येण्या जाण्याचा प्रचंड त्रास सुरू झाला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. धरणग्रस्त म्हणून अनेक गावे बुडीत क्षेत्रात समाविष्ट आहेत. या गावातील थोड्याफार जमिनी धरणाच्या पाण्याच्या कक्षेत येत असून इतर जमिनींना मात्र धोका



नाही अशा जमिनींचे व्यवहार करण्यासाठी आर्णी जिल्हा यवतमाळ येथील कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र लागत आहे. त्यासाठी नागरिकांना विनाकारण आर्णी येथील कार्यालयाच्या चकरा माराव्या लागत आहेत.बुडीत क्षेत्रातील गावाचे पुनर्वसन व्हावे मावेजा वाढवून मिळावा किंवा धरण रद्द करावे अशा मागण्यासाठी अनेक वेळा मोठ्या स्वरूपाची आंदोलने झाली पेसा अंतर्गत असलेले गाव बुडीत क्षेत्रात घेता येत नाही म्हणून प्रकल्प रद्द करावा अशी मागणी असूनही धरणाची लेवल कमी करण्यात आली नाही मावेजा पुनर्वसन झाले नाही काम जोरात सुरू झाले. त्यामुळे प्रकल्पग्रस्त काय होईल या चिंतेने हैराण झाले असून सर्वांचीच झोप उडालेली आहे दुसरीकडे धरणग्रस्त गावातील नागरिक ज्यांची शेत बुडीत क्षेत्रात येत नाही हे व्यवहारापायी तंग झाले असून मुलाबाळांचे विवाह तोंडावर आल्याने खरेदी विक्री व्यवहार होत नाही. त्यामुळे या विभागाचे आर्णी येथील कार्यकारी अभियंता अतिरिक्त कार्यभार निम्न पैनगंगा प्रकल्प पुनर्वसन विभागाचे प.सु. जुनेजा यांनी तात्काळ निम्न पैनगंगा प्रकल्प विभागाचे कार्यालय माहूरला सुरू करून नागरिकांच्या अडचण तात्काळ सोडवाव्यात अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# उन्हाचा तडाखा वाढला; लहान बालकांच्या आरोग्याची घ्या विशेष काळजी–बालरोग तज्ञ डॉ.विठ्ठल काळे यांचा इशारा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**परभणी । रमेश मुलगीर**

कॉटनचे सैल कपडे, भरपूर द्रवपदार्थ आणि दुपारच्या उन्हापासून दूर ठेवणे अत्यावश्यक.दिनांक १६ एप्रिल राज्यात तसेच परभणी शहरात व परभणी पुर्ण जिल्ह्यात सध्या उन्हाचा पारा मोठ्या प्रमाणात वाढला असून उष्णतेचा तीव्र परिणाम नागरिकांवर जाणवत आहे. विशेषतः लहान बालकांसाठी हा काळ अधिक धोकादायक ठरू शकतो. त्यामुळे बालकांच्या आरोग्याची योग्य काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत मानवत येथील सुप्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ. विठ्ठल काळे यांनी व्यक्त केले आहे.डॉ. काळे यांनी सांगितले की, लहान मुलांची शारीरिक प्रतिकारशक्ती कमी असते तसेच त्यांची त्वचा अतिशय नाजूक असते. त्यामुळे उष्णतेमुळे त्यांना त्वचारोग, घामोळे, उष्माघात (हीट स्ट्रोक), तसेच शरीरातील पाण्याची कमतरता (डिहायड्रेशन) यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. काही वेळा ही स्थिती गंभीर होऊ शकते, त्यामुळे पालकांनी विशेष सतर्कता बाळगणे गरजेचे आहे.उन्हाळ्यात बालकांना सैल, हलक्या रंगाचे आणि कॉटनचे कपडे परिधान करणे अत्यंत आवश्यक आहे. सिंथेटिक किंवा घट्ट कपडे टाळावेत. कॉटन कपड्यांमुळे




शरीराला हवा खेळती राहते आणि घाम शोषला जातो, त्यामुळे त्वचेचे विकार टाळता येतात.सकाळी १२ ते दुपारी ०४ या वेळेत उन्हाची तीव्रता सर्वाधिक असते. या काळात बालकांना घराबाहेर नेणे टाळावे. अत्यावश्यक असल्यास डोक्यावर टोपी, छत्री किंवा कापड वापरून संरक्षण करावे.

बालकांच्या शरीरात पाण्याची कमतरता होऊ नये यासाठी वेळोवेळी पाणी, दूध, लस्सी, ताक यांसारखे द्रवपदार्थ द्यावेत. नवजात बालकांसाठी आईचे दूध हेच सर्वोत्तम असल्याचे त्यांनी नमूद केले.

घर थंड व हवेशीर ठेवणे गरजेचे आहे. थेट सूर्यप्रकाश बालकांवर पडणार नाही याची काळजी घ्यावी. पंखा, कूलर किंवा आवश्यक असल्यास एसीचा योग्य वापर करावा; मात्र थंड वातावरण अचानक बदलू देऊ नये.बालकांमध्ये सतत रडणे, अंग गरम होणे, अशक्तपणा, उलट्या, जुलाब किंवा भूक न लागणे अशी लक्षणे दिसल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असेही डॉ. काळे यांनी सांगितले.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर लहान मुलांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. साध्या गोष्टींची काळजी घेतल्यास अनेक आजार टाळता येऊ शकतात. त्यामुळे सर्व पालकांनी जागरूक राहून बालकांचे संरक्षण करावे, असे आवाहन डॉ. विठ्ठल काळे यांनी केले आहे.






# तळणी येथे छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगांव । चंद्रकांत भोरे**

हदगाव तालुक्यात ७ मार्च ते ८ मे २०२६ याकालावधीत छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर अभियान टप्पा १ चे मंडळनिहाय शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. तरी परिसरातील नागरिकांनी या शिबिरास मोठ्या संख्येने उपस्थित राहून, आपल्या प्रलंबित कामाचा निपटारा नागरिकांनी करून घेतला. त्यानुसार हदगाव तालुक्यात १७ एप्रिल रोजी तळणी या ठिकाणी सामान्य जनतेच्या तक्रारींचे निवारण करण्यात आले आणि शासनाच्या विविध कल्याणकारी योजना थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी हदगाव प्रशासनाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज



समाधान शिबीर अभियान टप्पा १ चे आयोजन करण्यात आले होते.. हे शिबीर १७ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता तळणी येथे सुरू झाले होते व तसेच. प्रशासकीय पारदर्शकता आणि गतिमानता वाढवण्यासाठी हे शिबिर आयोजित केले होते.

**शिबिराचा मुख्य उद्देश**

शासकीय कार्यालयात हेलपाटे न घालता, नागरिकांना त्यांच्या हक्काचे दाखले, कागदपत्रे आणि योजनांचा लाभ एकाच ठिकाणी मिळावा, हा याशिबिराचा मुख्य उद्देश आहे. शासन आपल्यादारी या योजनेला बळकटी देण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .

**शिबिरात उपलब्ध असणाऱ्या प्रमुख सेवा**

विविध दाखले वाटप, ग्रीस्टॅंक, सातबारा अद्यावत करणे, पी.एम.किसान, प्रलंबित फेरफार निकाली, तुकडेबंदी कायद्याच्या अनुषंगाने कार्यवाही, ई-मोजणी सामाजिक अर्थसहाय्य योजनांचा लाभ, पाणंद रस्त्याबाबत कार्यवाही, लोकसेवा हक्क कायदा, तात्काळ सेवा, अभिलेख दुरुस्ती, हेल्पडेस्क इतर अनुषंगिक विषय असणार आहेत. या शिबिराला उपविभागीय अधिकारी श्री.अविनाश कांबळे,तहसीलदार सय्यद उमर व इतर सर्व विभागाचे कर्मचारी अधिकारी उपस्थित होते.

# माध्यमिक शिक्षक संघटनेच्या जामखेड तालुकाध्यक्षपदी सुदाम वराट, खजिनदारपदी मा.हनुमंत वराट तर प्राथमिक शिक्षक संघाच्या तालुकाध्यक्षपदी नवनाथ बहिर यांची निवड

## साकत गावाचा मान उंचावला: शिक्षकांचे गाव म्हणून विशेष ओळख :सर्वत्र अभिनंदन


लोकनेता न्यूज नेटवर्क

**जामखेड । सुनिल पुलवळे**

जामखेड तालुक्यातील साकत गावाने पुन्हा एकदा आपली शैक्षणिक परंपरा अधोरेखित करत मानाचा तुरा रोवला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक संघटनेच्या जामखेड तालुकाध्यक्षपदी सुदाम वराट सर, खजिनदारपदी मा. हनुमंत वराट सर तर प्राथमिक शिक्षक संघाच्या तालुकाध्यक्षपदी नवनाथ बहिर सर यांची निवड झाल्याने संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या तिहेरी यशामुळे सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.जामखेड तालुक्यात साकत हे शिक्षकांचे गाव म्हणून ओळखले जाते. गावातील अनेक नागरिक शिक्षकी पेशात कार्यरत असून शिक्षण क्षेत्रात साकतने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. विशेष म्हणजे, निवड झालेले हे तिन्ही मान्यवर साकत येथील जि.प. प्राथमिक केंद्र शाळा व श्री साकेश्वर विद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. या शाळांनी अनेक गुणवंत घडवून राज्यभर गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. या तिहेरी निवडीमुळे साकतची ही ओळख आणखी दृढ झाली आहे.

सुदाम वराट सर १९९८ पासून श्री साकेश्वर विद्यालयात सहशिक्षक म्हणून कार्यरत असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. शिक्षणाबरोबरच त्यांनी पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना शिक्षक आमदार अपूर्व हिरे यांच्या वतीने राज्यस्तरीय 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आला आहे.







विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक, नैतिक व सामाजिक मार्गदर्शन करतात. गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करून त्यांनी त्यांच्या शिक्षणाचा मार्ग सुकर केला आहे.गेल्या १७ वर्षांपासून ते पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून सध्या जामखेड मीडिया क्लबचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या कार्याबद्दल त्यांना 'राज्यस्तरीय पत्ररत्न पुरस्कार (२०२०)' तसेच 'संविधान महोत्सव २०२६' अंतर्गत 'आदर्श पत्रकार पुरस्कार' मिळाले आहेत.

नवनाथ बहिर सर गेली सुमारे १७ वर्षे शिक्षक म्हणून कार्यरत असून त्यांनी शिक्षण क्षेत्रात आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या मार्गदर्शनातून अनेक विद्यार्थी घडले असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ते सातत्याने प्रयत्नशील राहिले आहेत. ते संवेदनशील समाजसेवक म्हणूनही ओळखले जातात. विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असून गरजू व वंचित घटकांसाठी ते नेहमी पुढाकार घेतात.शिक्षण आणि समाजकार्यासोबतच त्यांनी कला क्षेत्रातही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. उत्कृष्ट चित्रकार म्हणून त्यांच्या कलाकृतींना मोठी दाद मिळत असून विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलतेची प्रेरणा निर्माण होत आहे.

मा. हनुमंत वराट सर यांची माध्यमिक शिक्षक संघटनेच्या खजिनदारपदी निवड झाली आहे. गेली २२ वर्षे ते शिक्षक म्हणून कार्यरत असून त्यांच्या सेवेला डिसेंबर २००३ मध्ये न्यू इंग्लिश स्कूल, राजुरी येथून सुरुवात झाली.आपल्या सेवाकाळात त्यांनी विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम राबवत शाळेच्या प्रगतीत मोलाचा वाटा उचलला आहे. राजुरी येथे कार्यरत असताना त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत जिल्हास्तरीय नाट्यस्पर्धेत शाळेला प्रथम क्रमांक मिळवून दिला. तसेच पर्यावरण संवर्धनाची जाणीव ठेवत विद्यार्थ्यांच्या सहभागातून वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनाचे उपक्रम यशस्वीपणे राबवले. तालुका व जिल्हास्तरावर अनेक वेळा प्रशिक्षक म्हणूनही त्यांनी प्रभावीपणे जबाबदारी पार पाडली आहे.

जुलै २०१५ मध्ये त्यांची ल. ना. होशिंग विद्यालय, जामखेड येथे बदली झाली. येथे त्यांनी अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती विभाग यशस्वीपणे सांभाळत अनेक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. सन २०२१ पासून ते शाळेच्या शालाबाह्य परीक्षा विभागाची जबाबदारी सांभाळत आहेत.एन.एम.एम.एस. व इतर शिष्यवृत्ती परीक्षांसाठी त्यांनी विशेष मार्गदर्शन व उपक्रम राबवले असून त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना एन.एम.एम.एस. तसेच पूर्व माध्यमिक शिष्यवृत्तीचा लाभ मिळाला आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत लक्षणीय वाढ झाली आहे.

शैक्षणिक कार्याबरोबरच ते दि पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या पगार नोकरांची पतसंस्था, जामखेड येथे संचालक म्हणूनही कार्यरत आहेत. प्रामाणिक, शिस्तप्रिय आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असणारे शिक्षक म्हणून हनुमंत वराट यांची परिसरात विशेष ओळख निर्माण झाली आहे.

एकाच गावातील तीन शिक्षकांची विविध महत्त्वाच्या पदांवर झालेली निवड ही साकत गावासाठी अत्यंत अभिमानाची बाब ठरली आहे. या यशामुळे गावाच्या शैक्षणिक परंपरेचा पुन्हा एकदा ठसा उमटला असून शिक्षकांचे गाव ही ओळख अधिक भक्कम झाली आहे. गावातील नागरिक, शिक्षकवर्ग आणि विविध स्तरांतून तिन्ही मान्यवरांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# हदगाव पंचायत समितीमध्ये कर्मचाऱ्यांची गैरहजेरी गटविकास अधिकारी यांचा वचक नाही

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगांव । चंद्रकांत भोरे**

ग्रामीण भागाचा कणा समजल्या जाणाऱ्या पंचायत समितीमध्ये गुरुवारी ग्रामीण भागातील आपली विविध कामे घेऊन आले असता बहुतांश अधिकारी , कर्मचारी गैरहजर होते विशेष बाब म्हणजे गटविकास अधिकारी त्यांच्या कक्षाला सुद्धा कुलूप लावलेले होते . त्यामुळे पंचायत समितीच्या कामानिमित्त ग्रामीण भागातून आलेल्या नागरिकांची हेळसांड झाली यावेळी ग्रामीण भागातून आलेल्या नागरिकांची गैरसोय झाल्याने नागरिक संतप्त झाले होते, गटविकास अधिकारी दशरथ आडेराघो यांच्या कक्षाला सुध्दा कुलूप लावलेले होते , तसेच कृषी विभाग , पाणीपुरवठा विभाग, बांधकाम विभाग, पशुसंवर्धन विभाग, लेखा शिक्षण विभागामध्ये कुणीही अधिकारी कर्मचारी




हजर नव्हते , विषेश बाब म्हणजे शासकीय कर्मचाऱ्यांसाठी कार्यालयीन वेळ सकाळी ९:४५ ते सायंकाळी ६:१५ पर्यंत कार्यालयात उपस्थित राहण्याचे वेळ निश्चित करण्यात आली त्यानुसार कर्मचाऱ्यांना कार्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक असताना अनेक कर्मचारी कार्यालयीन वेळेत येत नाही व जात नाही, हदगाव पंचायत समिती ही जिल्ह्यात अनेक कारणामुळे चर्चेत असून येथील गट विकास अधिकारी यांच्या पंचायत समिती कर्मचारी यांच्यावर कोणताही वचक नसल्याचे स्पष्ट होत आहे. हदगाव पंचायत समितीमधील बहुतांश कर्मचारी जिल्ह्याच्या ठिकाणावरून सोमवार किंवा शुक्रवार आठवडी बाजाराच्या दिवशी या दोन दिवस कार्यालयात येतात याच दिवशी कार्यालयातील कृषी, पशुसंवर्धन, बांधकाम, घरकुल, पंचायत लेखा विभाग, आस्थापना येथील अधिकारी विस्तार अधिकारी व लिपिक उपस्थित असतात. इतर दिवशी दौरा टाकून कोठे जातात कक्ष अधिकारी यांना ही माहीत नसते धक्कादायक बाब म्हणजे अनेक कर्मचारी तर कार्यालयात गैरहजर असुन हजेरी पत्रकावर विविध प्रकारच्या कारणे देऊन सह्या सुद्धा बघावयास मिळाले या भोंगळ कारभाराबद्दल अनेक लोकांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी या प्रकाराबाबत माहिती देण्यात आली, मात्र त्यांच्यावर कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने वेळ काढू कर्मचाऱ्यांचे चांगलेच फावले आहे. अशा कर्मचाऱ्यांवर आता कारवाई कोण करणार? असा संतप्त प्रश्न उपस्थित केला जात आहे,

# नांदेड तालूक्यातील विकास कामाचा दोन्ही आमदार यांनी घेतला आढावा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । अनिल पाटील तेलंग**

नांदेड तालुक्यात शासकिय कामे प्रामुख्याने तात्काळ निकाली काढण्यासाठी नांदेड उत्तर विधानसभा मतदारनसंघाचे आमदार बालाजीराव कल्याणकर व नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव तिडके बोंढारकर यांच्या अध्यक्षेखाली तालूक्यातील सर्व तालुका स्तरीय अधिकारी,तालूका कार्यालय प्रमुख विभाग यांचा महत्वाच्या विषयावर आढावा घेतला व अंमलबजावणी करण्याच्या सुचना दिल्या.विशेषता मुख्यमंत्री बळीराजा शेत/ पाणंद रस्ते, अन्न नागरी पुरवठा, सामाजिक सुरक्षा योजना,पाणी टंचाई,डखठ, वीज पुरवठा , कृषी विषयक बाबी,खत बी बियाणे पुरवठा,छत्रपती शिवाजी महाराज महाराज्यस्व शिबिर अभियान,नैसर्गिक आपत्ती अनुदान,विशेष सहाय्य अनुदान वाटप,ई फेरफार,जलजीवण पाणीपुरवठा,महावितरण,कायदा व सुव्यवस्था अदि विषयावर आढावा घेतला दोन्ही आमदार महोदयांनी उपस्थित अधिकाऱ्यांना चांगले व व्यवस्थित काम करण्याची सूचना दिली नांदेड तालुक्यामध्ये कोणतीही अडचण येऊ नये



असे पहावे व इतर काही अडचण असल्यास आमच्याशी संपर्क साधावा असे सांगितले.बैठकिस उप विभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ,तहसिलदार नांदेड संजय वारकड,उप विभागिय पोलिस अधिकारी नांदेड शहर,इतवारा ,गटविकास अधिकारी प्रविण सुरडकर,उप अधिक्षक भूमिअभिलेख,मृदणव जलसंधारण,तालूका कृषी अधिकारी,पुर्णा पाटबंधारे ,ग्रामीण पाणी पुरवठा,गट शिक्षण अधिकारी,पोलिस निरिक्षक शिवाजीनगर,लिंबगांव,नांदेड ग्रामिण, इतवारा, विमानतळ,नायब तहसिलदार सुनिल माचेवाड,संजय नागमवाड,नितिशकुमारनबोलेलू,इद्रजित गरड व तालूक्यातील लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

# हदगावात 'धरण उशाला अन् कोरड घशाला'; संतप्त शेतकऱ्यांचे तहसीलदारांना निवेदन,पाटबंधारे विभाग रामभरोसे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगाव । कृष्णा पाटील हरडफकर**

हदगाव आणि हिमायतनगर तालुक्यातील पिकांची अवस्था बिकट झाली असून, पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर ऊर्ध्व पैनगंगा पाटबंधारे विभागाच्या ढसाळ कारभाराचा निषेध करत *शेतकरी संघर्ष समितीच्या* वतीने तहसीलदार आणि पाटबंधारे विभाग क्र. ४ ला तात्काळ कॅनॉलचे आवर्तन सुरू करण्याबाबत निवेदन देण्यात आले.

पाणी असूनही शेतकरी तहानलेला*

सध्या कडक उन्हामुळे तालुक्यातील उभी पिके जळून खाक होत आहेत, तर दुसरीकडे गुराढोरांच्या पाण्याचा प्रश्नही उग्र बनला आहे. प्रशासनाने केवळ ४ दिवस पाणी देऊन अचानक पुरवठा बंद केल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट आहे. धरण उशाला आणि कोरड घशाला अशी परिस्थिती येथील बळीराजावर ओढवली असल्याच्या भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.




*पाटबंधारे विभागात अधिकाऱ्यांचा पत्ताच नाही! शेतकरी संघर्ष समितीचे पदाधिकारी जेव्हा पाटबंधारे कार्यालयात निवेदन देण्यासाठी पोहोचले, तेव्हा तिथे एकही जबाबदार अधिकारी उपस्थित नव्हता. अधिकारी कधी येतात आणि कधी जातात याचा कोणताही पत्ता नसल्याने, या कार्यालयाचा कारभार *'रामभरोसे'* सुरू असल्याचे चित्र पाहायला मिळाले. प्रशासकीय अनास्थेमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचा आरोप समितीने केला आहे.

*तीव्र आंदोलनाचा इशारा*

वरिष्ठ प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन पाण्याचे रोटेशन तात्काळ सुरू करावे, अन्यथा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

*निवेदन देतेवेळी उपस्थित मान्यवर:*

यावेळी आत्माराम पाटील वाटेगावकर, नागोराव सूर्यवंशी, संदीप पालकर, संदीप काळबांडे, पवन मोरे, अविनाश मोरे, माधवराव जाधव, सचिन मोरे व इतर अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रमजीवीचा दणका;आदिवासी पाड्याची तहान भागणार, पाड्यात नवीन बोअरवेलला मंजुरी


लोकनेता न्यूज नेटवर्क

**पालघर । श्री तुषार भोईर**

वाडा:- गुहिर सांबरे पाडा येथे आज महिलांची पाण्यासाठी होणारी २ किलोमीटरची पायपीट पाहून श्रमजीवी संघटनेने आज प्रशासनाला धारेवर धरले. संघटनेच्या जिल्हा महिला प्रमुख रेखा पऱ्हाड आणि तालुका सचिव सुरज दळवी यांनी गटविकास अधिकाऱ्यांना पाड्यावरील भीषण वास्तवाची जाणीव करून दिली. संघटनेच्या या दणक्यानंतर प्रशासनाने तात्काळ भूमिका घेत ग्रामसेवकांना घटनास्थळी बोलावले आणि बोरवेल ला मंजुर करून घेण्यात आली आहे.

तालुक्यातील गुहीर-सांबरे पाडा येथे पाणीटंचाईने भीषण रूप धारण केले आहे. येथील महिलांना कडक उन्हात पाण्यासाठी मैलोन्मैल वणवण करावी लागते. हक्काचा नळ आधीच काढून घेतल्याने विहिरीतील दूषित आणि तळाला गेलेले पाणी भरण्याशिवाय या महिलांकडे पर्याय उरला नव्हता. ही बाब समजताच आज १७ एप्रिल रोजी श्रमजीवी संघटनेच्या जिल्हा महिला





प्रमुख रेखा पऱ्हाड , तालुका सचिव सुरज दळवी आणि पदाधिकाऱ्यांनी सांबरे पाड्याला भेट दिली. यावेळी सांबरे पाड्यातील महिलांनी आपल्या अंगावर शहारे आणणाऱ्या व्यथा मांडल्या.पाड्यावरील महिलांच्या समस्या जाणून रेखा पऱ्हाड आणि सुरज दळवी यांनी तातडीने गटविकास अधिकारी गोवारी साहेब यांच्याशी संपर्क साधला. पाड्यावर पाणी नाही, लोक तहानेने व्याकुळ आहेत, प्रशासन झोपले आहे का? असा प्रश्न संघटनेने उपस्थित केला. संघटनेचा आक्रमक पवित्रा पाहून प्रशासनाने तातडीने ग्रामसेवक स्नेहल पाठारे यांना पाड्यावर पाठवले.ग्रामसेवकांनी प्रत्यक्ष विहिरीची आणि परिस्थितीची पाहणी केली असता, परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर संघटनेच्या रेट्यामुळे तिथे तात्काळ नवीन बोअरवेल घेण्याचे ठरले आणि बोरवेल मंजूर केली.

यावेळी तालुका उपाध्यक्ष बाळू लहांगे, शिवराम साळकर, रमेश वाघात, सांबरे पाडा गाव कमिटीच्या शुभांगी सांबरे यांच्यासह त्या गावातील महिला उपस्थित होते. श्रमजीवी संघटनेच्या या यशस्वी पाठपुराव्यामुळे सांबरे पाड्याचा अनेक वर्षांचा पाण्याचा प्रश्न सुटण्याच्या मार्गावर आहे.

# अखंड हरिनाम सप्ताह व विठ्ठल रुक्मिणी मुर्ती स्थापना व कलशारोहण सोहळा ७५०वाचकासह ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हनेगाव । संतोष चिद्रावार लोणीकर**

हनेगाव येथुन जवळच असलेल्या कर्नाटक मधील गंगणबीड व भवानी दापका मध्यभागी असलेले श्री विठ्ठल आश्रम येथे मुर्ती स्थापना व कलशारोहण व ७५० वाचकासह ज्ञानेश्वरी पारायण अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या भक्तिभावाने आयोजित करण्यात आला आहे. हा अखंड हरिनाम सप्ताह दि. १९ एप्रिल २०२६ (रविवार) ते दि.२६ एप्रिल २०२६ (रविवार) या कालावधीत संपन्न होणार आहे.

या धार्मिक सप्ताहात दररोज सकाळी हरिनाम जप, प्रवचन तसेच रात्री नामवंत कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत.तसेच दिनांक २४.०४.२०२६ रोजी सकाळी ठीक ११ वाजता कलशारोहण व मुर्ती स्थापना श्री श्री १०८ प.ब्र.डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज, उदगीर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

कीर्तन कार्यक्रम पुढीलप्रमाणे :

दि. १९-०४-२०२६ रविवार
ह.भ.प. श्री. शरद महाराज जेकेकुर,मुरगा

दि. २०-०४-२०२६ सोमवार
ह.भ.प. श्री. अनिल पाटील महाराज बाभळगाव

दि. २१-०४-२०२६ मंगळवार
ह.भ.प. श्री. जगन्नाथ देशमुख महाराज पंढरपूर

दि. २२-०४-२०२६ बुधवार
ह.भ.प. भागवताचार्य श्री. केशव महाराज उकळीकर



दि. २३-०४-२०२६ गुरुवार
ह.भ.प. श्री. श्रीनिवास जगताप महाराज पंढरपूर

दि. २४-०४-२०२६ शुक्रवार
ह.भ.प. श्री. चंद्रशेखर महाराज देगलूरकर

दि. २५-०४-२०२६ रोजी ह.भ.प. श्री. उमेश महाराज दशरथे, आळंदी देवाची

दि.२६.०४.२०२६ रोजी ह.भ.प.बाबुराव महाराज लोणीकर यांचे काल्याचे कीर्तन व होणार असून व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन श्री विठ्ठल आश्रम गंगणबीड, भवानी दापका,आकनापुर,भंडारकुमठा ता.कमालनगर जि.बिदर यांच्या वतीने करण्यात आले असून कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समस्त गावकरी मंडळी, परिश्रम घेत आहेत.

या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घेण्यासाठी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अखंड हरिनाम सप्ताहाचे संयोजक ह.भ.प.श्री बाबुराव महाराज लोणीकर यांच्या वतीने करण्यात आले आहे

## नांदेड जिल्ह्यामध्ये चोरीच्या घटना सुरूच


# नांदेड बस स्थानकात १ लाख ५८ हजारांची चोरी नायगाव मध्ये डिक्कीतून ५० हजारांची चोरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड ।अनिल पाटील तेलंग**

जिल्ह्यात चोरीच्या घटना वाढत असून १५ एप्रिल २०२६ रोजी वजीराबाद व नायगाव येथे दोन वेगवेगळ्या ठिकाणी चोरीच्या घटना घडल्या आहेत.

वजीराबाद येथे दुपारी सुमारे १.४० वाजण्याच्या सुमारास बसस्थानक परिसरात फिर्यादी रंजित आनंदराव शिरसरे (वय ३३, रा. जाकापूर ता. कंधार) यांच्या जवळील पर्समधील सुमारे १ लाख ५८ हजार १५८ रुपयांचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्यांनी लंपास केले. याप्रकरणी वजीराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १८४/२०२६, कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, नायगाव येथील हेडगेवार चौकात दुपारी सुमारे १२.५० वाजता दुसरी चोरीची घटना घडली. फिर्यादी राजेश कोडिबा जाधव (वय ४०, रा. सातेगाव ता.





नायगाव) यांच्या मोटारसायकलच्या डिकीत ठेवलेली ५० हजार रुपयांची रोकड अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली. या प्रकरणी नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ९३/२०२६, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता २०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी चोरट्यांचा शोध घेण्याचे काम हाती घेतले आहे.

# जिथे माणसाच्या ओठांवर तहान कोरडी पडते,तिथेच जंगलातल्या मुक्या जीवांची व्यथा कोण ऐकते

लोकनेता न्यूज नेटवर्क
**श्रीक्षेत्र माहूर । प्रतिनिधी**

किनवट-माहूरच्या जळत्या भूमीत, ४२-४५ अंशांच्या तापलेल्या वाऱ्यांत, धरती जणू अंगार बनते
नद्या आटतात
ओढे हरवतात,आणि जंगलातल्या प्रत्येक जीवाच्या डोळ्यांत एकच प्रश्न दाटतो ,पाणी कुठे?
अशा वेळी, कोणीतरी केवळ माणसांसाठीच नव्हे, तर निसर्गाच्या प्रत्येक श्वासासाठी उभं राहतंते नाव म्हणजे
आदरणीय श्री प्रशांत भाऊ राठोड
गेली ३० वर्षे समाजसेवेच्या वाटेवर चालणारा हा प्रवास, केवळ माणुसकीपुरता मर्यादित नाही, तर तो जंगलातील प्रत्येक प्राण्याच्या जीवनाशी जोडलेला आहे!
तप्त धरा, कोरडी हवा, जीव झाला हैराण, पानवठ्यांतून जीवांना, मिळतो जीवनदान





गतवर्षापासून, तळपत्या उन्हात, स्वतःच्या खासगी टँकरने,
वन्यजीवांसाठी पानवठ्यांमध्ये पाणी पुरवठाही केवळ सेवा नाही, ही तर जीवनाशी केलेली नि:स्वार्थ मैत्री आहे !
शासनाची परवानगी घेऊन,
स्वतः उपस्थित राहून, जेव्हा ते टँकरने पाणी भरतात, तेव्हा त्या क्षणी निर्माण होतो, मानवतेचा एक जिवंत उत्सव !
वो जो प्यासे थे, जंगल के हर एक किनारे पर, एक दरिया बन के आया, इंसान के रूप में!
पानवठा भरताक्षणी,
जंगलातील वानर, ससे,मोर, पक्षी, आणि इतर वन्यजीव धावत येतातत्या क्षणी, त्यांच्या डोळ्यांत दिसतो कृतज्ञतेचा नि:शब्द संवाद
ही दृश्यं केवळ व्हिडिओ क्लिप नाहीत, ती आहेत मानवतेची जिवंत कविता !
जंगलातल्या शांततेत, जेव्हा पाणी सळसळतं, तेव्हा प्रत्येक थेंबात, एक 'प्रशांत' स्पंदतं!
आजच्या राजकारणात जिथे दिखावा जास्त, तिथे अशी नि:स्वार्थ सेवा एक वेगळाच आदर्श निर्माण करते
सियासत में बहुत देखे हैं चेहरे नकाब वाले, मगर वो शख्स अलग है, जो खुदा के काम वाले!
ही सेवा केवळ समाजकार्य नाही,
ही एक संस्कृती आहे,
जी आपल्याला शिकवते ..
माणुसकी म्हणजे फक्त माणसांपुरती मर्यादित नसतेज्यांच्या हृदयात निसर्गासाठी प्रेम असतं, त्यांच्या प्रत्येक कृतीत देवत्व दिसतं..!
आणि म्हणूनच.
प्रशांत भाऊ राठोड हे केवळ नाव नाही,
तर एक विचार आहे
एक प्रेरणा आहे
आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे.
एक जिवंत संवेदना आहे !

# सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या वाढदिवसा निमित्त प्रसिद्ध कीर्तनकार संतचरणरज ह.भ.प.श्री बाळकृष्ण दादा वसंतगडकर यांच्या कीर्तन सोहळ्याचे आयोजन

## चेअरमन शाम भोसले व सौ दिपाली ताई भोसले यांच्या संकल्पनेतून

लोकनेता न्यूज नेटवर्क
**औसा । महेश कोळी**

औसा तालुक्यातील संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन शाम भोसले व जि प सदस्य सौ दिपालीताई भोसले यांच्या संकल्पनेतून १९ एप्रिल रविवारी रोजी सायंकाळी ७:३० वाजता मातोळा येथील श्री माधवराव भोसले हायस्कूल येथे प्रसिद्ध कीर्तनकार संतचरणरज ह भ प श्री बाळकृष्ण दादा वसंतगडकर कराड सातारा यांच्या कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपरावजी देशमुख यांच्या ७६ व्या वाढदिवसानिमित्त हा विशेष आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कीर्तनाच्या माध्यमातून समाजात




सद्भावना, संस्कार आणि अध्यात्मिक मूल्ये रुजवण्याचा संदेश देण्याचा या कार्यक्रमामागील उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.प्रसिद्ध कीर्तनकार संतचरणरज ह.भ. प. श्री बाळकृष्ण दादा वसंतगडकर कीर्तनासाठी संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कीर्तनातून अध्यात्म, समाजप्रबोधन आणि संत साहित्याचा गोड संगम अनुभवायला मिळतो.त्यामुळे १९ एप्रिल रोजी रविवारी अक्षय तृतीया च्या पावन पर्वात सायंकाळी ७:३० वाजता श्री माधवराव भोसले हायस्कूल मातोळा सुरू होणार असून परिसरातील नागरिक, वारकरी आणि भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन चेअरमन शाम भोसले व जिल्हा परिषद सदस्य सौ दिपालीताई श्याम भोसले यांच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच हा कार्यक्रम शांतता व शिस्तीने पार पाडण्यासाठी आयोजकांकडून आवश्यक व्यवस्था करण्यात येणार असल्याची माहिती ही देण्यात आली.या कीर्तन सोहळ्यामुळे मातोळा व परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार असून, संत परंपरेचा संदेश समाजापर्यंत पोहोचवण्याचा हा एक सुंदर उपक्रम ठरणार आहे.

## तहानलेल्या नागरिकांना वाटर एटीएम फिल्टर मध्ये पाणी मिळणार का...

# कित्येक वर्षापासून धूळ खात गाडी पार्किंगचे जागी पडून असलेली वॉटर एटीएम फिल्टर मशीन बनली आता शोभची वस्तू

लोकनेता न्यूज नेटवर्क
**किशोर की. कांबळे । दिग्रस**

दिग्रस नगर परिषद. मध्ये दररोज शेकडो नागरिक ये जा करतात परंतु काम होईपर्यंत नगरपरिषद मध्ये बसून राहावा लागतो परंतु कडाड्याच्या तापत्या उन्हात तहानलेल्या नागरिकांना पाणी प्यायची सोय नगरपरिषद मध्ये कुठलेच दिसून येत नाही. वाटर एटीएम फिल्टर आहे.. परंतु नावालेस दिसून येत आहे . अनेक नागरिक वॉटर एटीएम फिल्टर वर जाऊन कोरड्या मुखाने परत यावा लागतो. ज्या पक्षाची बहुमत आहे त्या पक्षाच्या अनधिकृत रित्या सुसज्ज कॅबिन बनुन त्यांची एवस्था नगरपरिषद कडून केल्या जाते परंतु नागरिकांसाठी कोणतीही पिण्याचे पाण्याची व्यवस्था करू शकत नाही ही नगरपरिषदेसाठी व नगरसेवकांसाठी मोठे शोकांतिका आहे. असे नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे. सदर गेल्या




आठवड्यात एका सामाजिक कार्यकर्त्यांनी नगर परिषदेचे उपाध्यक्ष तथा सभापती यांच्या केबिन संदर्भात नगरपरिषद कार्यालयाला तक्रारीच्या माध्यमातून व माहितीचे अधिकार संदर्भात वेठीस धरले होते कारण नगरपरिषद बिनधास्तपणे इल्लीगल व नियमबाह्य काम करण्यास नंबरवन (१) दिसत आहे. असे संतप्त झालेल्या नागरिकाकडून बोलल्या जात आहे. तसेच मागील मार्च महिन्यात अपंग दलाचे जिल्हाध्यक्ष दीपक जाधव यांनी. श्री घंटी बाबा यांच्या मंदिराच्या पाठीमागच्या मार्केटच्या लिलाव संदर्भात नगरपरिषद ला आत्मदहनाच्या इशाराच्या माध्यमातून नगरपरिषदला वेठीस धरले होते त्यातही नगरपरिषद दिग्रसला नमती बाजू घ्यावी लागली होती. यामधून नक्कीच नगरपरिषद चुकीचे नियमबाह्य काम करण्यास पटाईत दिसून येत आहे. असे संपूर्ण दिग्रस शहरातील नागरिकांच्या चर्चेचा जोर धरत आहे.

# भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार २०२६ श्री सुनील श्रीरंग ढमाळ यांना प्रदान

लोकनेता न्यूज नेटवर्क
**खंडाळा । विजय जगताप**

ए. डी. फाउंडेशन महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या माध्यमातून समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम राष्ट्रीय जीवनगौरव पुरस्कार २०२६ देऊन गौरव करण्यात आला. समाजासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या महान व्यक्तींच्या कर्तृत्वाचा सन्मान व्हावा, त्यांना प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या कार्यातून इतरांनाही प्रेरणा मिळावी या उद्देशाने हा राष्ट्रीय पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. शनिवार दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ३ वाजता पुणे स्वारगेट येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सभागृहामध्ये अत्यंत उत्साहपूर्ण, दिमाखदार वातावरणात संपन्न झालेल्या या सोहळ्यात विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व सेवाभावी क्षेत्रात



उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून आयकर आयुक्त मुंबई डॉ. सचिन मोटे, भारत विभूषण पंजाब सरकार श्री दिगंबर तायडे, सहाय्यक पोलीस आयुक्त पुणे सौ. रुक्मिणीताई गलांडे, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री राम मांडुरके व अध्यक्ष अशोक गोरड उपस्थित होते. यावेळी ए. डी. फाउंडेशनच्या सकारात्मक विधायक व सातत्यपूर्ण वाटचालीबद्दल सर्वच मान्यवरांनी कौतुक केले.

तसेच व्यासपीठावरील प्रमुख पाहुणे आयकर आयुक्त मुंबई डॉ. सचिन मोटे आणि इतर मान्यवरांचे स्वागत आणि प्रास्ताविक फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक गोरड यांनी केले.

उद्योग, सेवाभाव आणि सुसंस्कृत दृष्टिकोन या तीन आधारांवर उभे असलेले व्यक्तिमत्व म्हणजे मु. पो. पारगाव. ता. खंडाळा येथील श्री सुनील श्रीरंग ढमाळ. उद्योग क्षेत्रात कार्यरत असलेले सुनील ढमाळ यांची प्रामाणिकता, जनतेशी असलेला थेट संवाद आणि व्यवसायिक विकासात्मक दृष्टिकोनामुळे लोकांचा ठाम विश्वास त्यांनी संपादन केला आहे. सुनील ढमाळ साहेब यांचा प्रामाणिकपणा आणि निर्णयक्षमता यामुळे त्यांना खंडाळा तालुक्यामधील सर्वसामान्य नागरिकांमध्ये आदराचे स्थान आहे. त्यांच्या कामातून आजही अनेक युवक प्रेरणा घेतात आणि व्यवसायिक मार्गावर पाऊल टाकत आहेत. अनेकांना त्यांनी व्यवसायिक मार्गदर्शन करून स्वावलंबी बनवले आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन आदर्श उद्योगरत्न म्हणून भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जीवन गौरव पुरस्कार २०२६ देऊन त्यांना गौरवण्यात आले.

कार्यक्रमात निवड झालेल्या सर्व पुरस्कार्थींना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ए. डी. फाउंडेशन समूहाच्या संपूर्ण टीमने विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नम्रता बागरेचा यांनी प्रभावीपणे करुन उपस्थित मान्यवरांचे आभार मानले. हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून समाजातील महान व्यक्तींच्या कर्तृत्वाला सलाम करणारा, प्रेरणादायी सोहळा ठरला.

# कामारी येथे मोफत सर्वरोगनिदान व उपचार शिबीराचे आयोजन

## सर्व रुग्णांनी आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा–आ.कोहळीकर

लोकनेता न्यूज नेटवर्क
**हिमायतनगर । लक्ष्मण शेन्नेवाड**

तालुक्यातील कामारी येथे सर्व रोग निदान मोफत तपासणी व उपचार शिबीराचे रविवार ता. १९ एप्रिल २०२६ रोजी जिल्हा परिषद शाळा येथे आयोजन करण्यात आले असल्याने रुग्णांनी आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन हदगाव हिमायतनगर तालुक्याचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी केले आहे.



दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था संचलित आचार्य विनोबा भावे ग्रामीण रूग्णालय सावंगी ( मेघे ) यांच्या संयूक्त विद्यमानाने व तसेच आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या पुढाकारातून मोफत सर्व रोगनिदान व उपचार शिबीर ता.१९ रविवारला संपन्न होणार आहे. या शिबीरामध्ये नेत्र तज्ञ डोळ्याचे सर्व आजार यामध्ये मोतीबिंदू शस्त्रक्रिया, तिरळेपणा इत्यादी, अस्थिरोग तज्ञ यामध्ये संधीवात, मणक्यात असणारे गॅप, वाकलेले पाय, फॅक्चर व तसेच हाडाचे सर्व आजार,मेडिसीन तज्ञ यामध्ये रक्तदाब, ब्लडशुगर,भरेच दिवसाचा ताप, किडनीचे आजार, हृदयरोग, अशक्तपणा,वारंवार चक्कर येणे, हृदयरोग छातीत दुखणे,धाप लागणे, छातीत धडधड करणे, इत्यादी,सर्जरी तज्ञ यामध्ये हायड्रोसील, हर्निया, अंगावरील गाठी, आतड्याचे आजार, मुतखड्याचे आजार, पोटाचे आजार,गलगंड, थॉयराईड,ईत्यादी, व तसेच बालरोग तज्ञ यामध्ये हृदयाला छिद्र असणे, मंतीमंद,मुलांच्या विकासासंबंधीचे आजार, तसेच कुपोषण व तसेच लहाण मुलांचे सर्व आजार, स्त्रीरोग तज्ञ यामध्ये मासीक पाळीचे आजार,पांढरे पाणि जाणे, गाठी, गर्भपिशवी व गर्भाशयाचे आजार इत्यादी, त्वचारोग तज्ञ यामध्ये खाज, गचकरण, अंगावरील पांढरे डाग, त्वचेचे विविध आजार, व तसेच श्वनरोग तज्ञ या मध्ये दमा, बर्याच दिवसापासूनचा खोकला, तोंडाद्वारे पडणारे रक्ताचे ठसे,इत्यादी, मुखरोग तज्ञ यामध्ये दातांचे विविध आजार, दुभंगलेले ओठ, टाळूचे आजार, तोंडामध्ये जखम होणे इत्यादी सर्व प्रकारच्या आजाराची तपासणी तज्ञ डाँक्टरांकडून केली जाणार आहे. व तसेच उपचार आणि आवश्यक असल्यास रूग्णालयात भरती करण्यात येणार आहे. या भव्य शिबिराचा गरजू रूग्णांनी लाभ घ्यावा. असे आवाहन आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी केले आहे

# ज्वारी, मका उत्पादक शेतकऱ्यांची नोंदणी सुरू बोगसगिरी रोखण्यासाठी शेतात जाऊन पंचनामे करा

लोकनेता न्यूज नेटवर्क
**किनवट । शेख शौकत**

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत पणन हंगाम २०२५-२६ साठी भरड धान्य खरेदीपूर्वीची शेतकरी नोंदणी १३ एप्रिलपासून अधिकृतपणे सुरू झाली आहे. मात्र, या प्रक्रियेत व्यापाऱ्यांकडून होणारी संभाव्य बोगसगिरी रोखण्यासाठी आमदार भीमराव केराम यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे.

महसूल व कृषी विभागाने प्रत्यक्ष शेतात जाऊन पीक असल्याची खात्री केल्यानंतरच अभिकर्ता आदिवासी विकास महामंडळाने नोंदणी
मे ते ३० जून या कालावधीत ही प्रत्यक्ष खरेदी प्रक्रिया राबवली जाणार आहे.
करावी, अशा सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. कृषी साहाय्यकांनी शेतात जाऊन ज्वारी व मका पिकाची पाहणी करावी आणि तलाठ्यांनी तो सातबारा प्रमाणित करावा. या पडताळणीनंतरच आदिवासी विकास



महामंडळाने ऑनलाइन नोंदणी पूर्ण करावी, असे सांगण्यात आले आहे. ज्वारी व मका ऑनलाइन नोंदणी १३ एप्रिल ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत होईल आणि भरड धान्य थेट खरेदीचा कालावधी १ मे ते ३० जून २०२६ असणार आहे. मका पिकाचे क्षेत्र १० हजार १७३ हेक्टर असून ज्वारी पिकाचे क्षेत्र २ हजार ६३४ हेक्टर आहे.

शेतकऱ्यांच्या रांगा

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने १ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत नोंदणी पूर्ण करण्याचे आदेश दिले होते. आदिवासी विकास महामंडळाने १३ एप्रिल ही तारीख निश्चित केली असली, तरी पोर्टल आधीच सुरू झाल्याने काही शेतकऱ्यांनी त्यावर आक्षेप घेतला होता. १३ एप्रिल नोंदणीच्या पहिल्याच दिवशी कडक उन्हाची तमा न बाळगता आदिवासी विकास महामंडळाच्या कार्यालयाबाहेर शेतकऱ्यांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या

# आखाती युद्धामुळे शेतकरी घायाळ; सिंचन साहित्याच्या किमतीत वाढ?

## कच्च्या मालाचा तुटवडा: पॉलिमर महागल्याने कृषी क्षेत्राला महागाईचा विळखा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । संतोष चिद्रावार लोणीकर**

आखाती देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे आयातीत मोठी घट झाल्याने कच्च्या मालाचा तुटवडा निर्माण झाला आहे. याचा थेट परिणाम कृषी क्षेत्रावर होत असून पॉलिमर व प्लास्टिक दाण्यांचे (ग्रॅन्युअल) दर दुप्पट वाढले आहेत. परिणामी पीव्हीसी पाईप, प्लबिग साहित्य ,मल्चिंग पेपर तसेच ठिंबक सिंचन संचाच्या किमतीत लक्षणीय वाढ झाली आहे. आधीच नैसर्गिक संकटांनी त्रस्त असलेल्या शेतकऱ्यापुढे आता वाढत्या खर्चाचे नवे आव्हान उभे टाकले आहे.

देगलूर तालुक्यातील अनेक शेतकरी उन्हाळी व खरीप हंगामाच्या तयारीत असताना सिंचन साहित्याच्या वाढलेल्या किमतीमुळे नियोजन कोरमडले आहे. ठिबक सिंचन संच, जो पाण्याची बचत व उत्पादन वाढीसाठी महत्त्वाचा मानला जातो. त्याचा खर्च २० ते ३० टक्क्यांनी वाढल्याचे व्यापाऱ्याकडून सांगण्यात येत आहे. तसेच मल्चिंग पेपर व पीव्हीसी पाईप यांचे दरही मोठ्या प्रमाणात वाढल्याने भाजीपाला व फळबाग लागवडीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. दरवाढीमुळे अनेक शेतकरी नवीन सिंचन प्रकल्प पुढे ढकलत आहेत.

तर काहींनी पारंपारिक पद्धती वळण्याचा विचार सुरू केला आहे. आधीच खत, बियाणे आणि मजुरी महाग झाली आहे. त्यात आता ठिंबक व पाईपचे दर वाढल्याने शेती करणे परवडेनाशे झाले आहे.

असे शेतकरी बोलत आहेत. सरकारने यावर तातडीने उपाययोजना करून अनुदान वाढवावे अशी मागणी ही शेतकरी वर्गातून करण्यात





येत आहे. दरम्यान कृषी तज्ञाच्या मते सध्याची परिस्थिती दीर्घकाळ राहिल्यास उत्पादन खर्च वाढून बाजारभावावरही परिणाम होऊ शकतो. त्यामुळे शेती क्षेत्रावर व्यापक परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**कच्चामाल महागल्याने सर्वत्र दरवाढ**

प्लास्टिक ग्रॅज्युअलच्या दरात तीस ते चाळीस टक्के पर्यंत वाढ झाली आहे. यामुळे पाईप फिटींग, मल्चिंग पेपर, ठिंबक संच यासह सर्वच प्लास्टिक वस्तूंच्या किमती वाढल्या आहेत.

**प्लबिग साहित्याचे दर वधारले**

घरगुती तसेच शेतातील पाण्याच्या व्यवस्थेसाठी लागणारे प्लबिग फिटिंग, व्हॉल्ह, पाईप कनेक्टर यांचे दरही वाढले आहेत. यामुळे विहीर, बोरवेल, पाणीपुरवठा यासाठींचा खर्च वाढलेला आहे. त्यामुळे आर्थिक फटका बसत आहे.

**युद्धांची आता शेतकऱ्यांनाही झळ**

आखाती युद्धामुळे कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. प्लास्टिक उद्योग मोठ्या प्रमाणावर तेलावर अवलंबून असल्याने उत्पादन खर्च वाढला आहे.

**पाण्याच्या बाटल्या प्लास्टिक पॅकिंग साठी अतिरिक्त पैसे**

प्लास्टिक महागल्याने पाण्याच्या बाटल्या, दुधाच्या पिशव्या व इतर पॅकिंग साहित्यावरही दरवाढ झाली आहे. किरकोळ विक्रेत्याकडून ग्राहकाकडून अतिरिक्त पैसे घेतले जात असल्याचे चित्र आहे. व्यापाऱ्यांच्या मते आंतरराष्ट्रीय परिस्थिती स्थिर होईपर्यंत दर कमी होण्याची शक्यता कमी आहे. कच्च्या तेलाचे दर स्थिर झाल्यानंतरच प्लास्टिक उद्योगाला दिलासा मिळू शकतो. आम्हाला कंपन्याकडूनच वाढीव दराने मान मिळत आहे असे देगलूर शहरातील व्यापारी सांगत आहेत.

**पीव्हीसी पाईपच्या दरात भरमसाठ वाढ**

दोन इंची पाईप ४२५ रुपये, २.५ उंची-६१० रुपये, तीन इंची-८५० रुपये, चार इंची-१२३० रुपये, पाच इंची-२०५० रुपये, सहा इंची-२८०० रुपये इतके दर पूर्वीच्या तुलनेत हे दर २० ते ३० टक्क्यांनी वाढले असल्याचे विक्रेत्यांची म्हणणे आहे.

परिणामी शेतीसाठी आवश्यक साहित्य मागविले असून त्याची झळ थेट शेतकऱ्यांना बसत आहे.

ठिंबक आणि पाईप शिवाय शेती करणे शक्य नाही पण दर इतके वाढले की नवीन लागवड करणे अवघड झाले आहे.

> **उत्तम रामा मोरेवाड माजी पंचायत समिती सदस्य व शेतकरी लोणीमल्चिंग पेपर आणि पाईप महागल्याने खर्च वाढवला आहे उत्पादनाचा भाव तसाच राहिल्याने आम्ही अडचणीत आलो आहोत.**
> —केशव शंकरराव बिरादार लोणी

> **भाजीपाला व फळबागांसाठी वापरल्या जाणाऱ्या मल्चिंग पेपरच्या किमतीतही मोठी वाढ झाली आहे. ठिबक सिंचन संच (ड्रिप)१५ ते २५ टक्क्यांनी महागला असून त्यामुळे नवीन लागवडीचा खर्च वाढला आहे.**
> —नागनाथ देशपांडे शेतकरी

# एन जे ॲनिमल रेस्क्यू टीमकडून पक्षी व प्राणी बचावाचे उल्लेखनीय कार्य

लोकनेता न्यूज नेटवर्क

**छ.संभाजीनगर । डॉ.ज्ञानदेव चेपटे**

छत्रपती संभाजीनगर-दि.१७ एप्रिल : शहरामध्ये व परिसरामध्ये बऱ्याच वर्षांपासून एन जे ॲनिमल रेस्क्यू टीम ही संस्था जखमी पक्षी व प्राण्यांच्या बचावासाठी सातत्याने कार्यरत आहे. कुठेही जखमी किंवा अडचणीत सापडलेले प्राणी आढळताच, ही टीम तात्काळ घटनास्थळी पोहोचते.या संस्थेमध्ये एन जे ऑनिमल रेस्क्यू टीममध्ये श्री.नितेश जाधव, श्री.आंनद वाघमारे,श्री.दत्ता बारोरकर, श्री.प्रकाश कोकळे या सर्वांच्या सहकार्याने व योगदानाने त्या प्राण्यावर त्वरित उपचार करून त्यांना पुन्हा सुरक्षितपणे नैसर्गिक वातावरणात सोडण्यात येते.




या टीमच्या सेवेमुळे अनेक निरपराध जीवांचे प्राण वाचत असून, निसर्ग संवर्धनासाठीही या टीमच्या वतीने मोलाचे योगदान दिले जात आहे.

# नांदेडमध्ये अवैध वाळू उत्खननावर पोलिसांची मोठी कारवाई

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । अनिल पाटील तेलंग**

जिल्ह्यात अवैध वाळू उत्खननाविरोधात पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल १ कोटी ७० लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई १७ एप्रिल २०२६ रोजी पहाटे करण्यात आली.पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी, बिलोली यांच्या पथकाने ही संयुक्त कारवाई केली. गुप्त माहितीच्या आधारे गोदावरी नदीपात्रात अवैधरीत्या वाळू उपसा सुरू असल्याचे उघडकीस आले.या कारवाईदरम्यान तीन हायवा ट्रक, एक जेसीबी, मोठी फायबर बोट, लहान इंजिन बोट तसेच मोठ्या प्रमाणात वाळू असा एकूण १.७० कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. घटनास्थळी रात्रीच्या सुमारास छापा टाकून ही कारवाई करण्यात आली.



या प्रकरणी एकूण ९ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यामध्ये वाहन चालक व मालकांचा समावेश आहे. सर्व आरोपी नायगाव तालुक्यातील विविध गावांतील असल्याची माहिती पोलिसांनी दिली.पोलीस अधीक्षकांनी संबंधित पथकाचे कौतुक करत अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाई सुरू ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. सध्या या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# प्रदूषण लपवणाऱ्यांना इशारा! चंद्रपूरमध्ये सरकारचा कडक कारवाईचा मोड–पंकजा मुंडे यांची थेट पाहणी,तृतीय पक्ष तपासणी अनिवार्य!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**चंद्रपूर । सिद्धेश्वर केंद्रे**

चंद्रपूर जिल्ह्यात दिवसेंदिवस गंभीर होत चाललेल्या प्रदूषणाच्या प्रश्नावर अखेर राज्य सरकारने कडक भूमिका घेत ठोस कारवाईची दिशा निश्चित केली आहे. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी आज जिल्ह्यात प्रत्यक्ष पाहणी दौरा करत प्रदूषण नियंत्रणासाठी तृतीय पक्ष तपासणीची सक्ती केली जाणार असल्याची ठाम घोषणा केली.

या दौऱ्यात विधानसभेत सातत्याने पाठपुरावा करणारे आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत ऊर्जानगर परिसरातील वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड तसेच चंद्रपूर सुपर थर्मल पॉवर स्टेशन येथील कोळसा हाताळणी प्रकल्पांची सखोल पाहणी करण्यात आली. उघड्यावरून कोळशाची वाहतूक, हवेत उडणारी राख व धूर यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचे स्पष्ट झाले.



यानंतर बेलसणी परिसरातील कोळसा धुलाई प्रकल्पांमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान आणि जमिनीची हानी याचीही पाहणी करण्यात आली. स्थानिक नागरिकांनी मांडलेल्या समस्या मंत्री मुंडे यांनी थेट ऐकून घेतल्या. झरपट नदी परिसरात जाऊन नदीतील प्रदूषण, गाळ साचणे आणि पाण्याच्या गुणवत्तेतील घसरण याचाही आढावा घेण्यात आला.जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीत आमदार मुनगंटीवार यांनी आक्रमक भूमिका घेत अनेक ठोस मागण्या मांडल्या. प्रदूषण नियंत्रणासाठी स्वतंत्र स्थायी समिती स्थापन करावी, कोळसा हाताळणी प्रकल्प बंदिस्त करावा किंवा पर्यायी व्यवस्था उभी करावी, तसेच शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. याशिवाय, प्रदूषणाची माहिती पारदर्शकपणे जनतेसमोर ठेवण्यासाठी तपासणी दर्शक फलक लावण्याची सूचनाही त्यांनी केली.झरपट नदी पुनरुज्जीवनासाठी 'निरी' आणि आयआयटी पवई यांच्या संयुक्त समितीकडून तीन महिन्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच 'मियावाकी' पद्धतीने हरित पट्टा उभारण्यावरही भर देण्यात आला.दरम्यान, मंत्री पंकजा मुंडे यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, चंद्रपूरमध्ये प्रदूषणाची स्थिती अत्यंत गंभीर आहे. ते लपवण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई न देणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशाराही त्यांनी दिला.प्रशासनाला कडक निर्देश देत त्यांनी सांगितले की, तृतीय पक्ष तपासणीद्वारे प्रदूषण नियंत्रणाची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल आणि दिलेल्या सर्व सूचनांची ठराविक कालमर्यादेत पूर्तता केली जाईल. जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कारवाई होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.या पाहणी दौऱ्यामुळे चंद्रपूरच्या प्रदूषणाच्या प्रश्नावर केवळ चर्चा न राहता प्रत्यक्ष कृतीची सुरुवात झाल्याचे स्पष्ट झाले असून, आता पुढील निर्णयांवर जिल्ह्याचे भवितव्य अवलंबून असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

# अखिल महाराष्ट्र शिक्षक संघ नांदेड जिल्हा उपाध्यक्षपदी;माधव पाटील तुपदाळकर यांची निवड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**संजय यलमवाड । मुखेड**

मुखेड पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कुल मुलींचे मुखेड प्रशाळेतील शांत संयमी स्वभाव असलेले सह शिक्षक माधव पाटील तुपदाळकर यांची अखिल महाराष्ट्र शिक्षक संघाच्या नांदेड जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली असून,कासराळी येथे बिलोली तालूका नुतन कार्यकारणी निवड कार्यक्रमाच्या ठीकानी अखिल महाराष्ट्र शिक्षक संघाचे प्रदेश अध्यक्ष मा.देविदासराव बस्वदे,यांच्या हस्ते कर्तव्यदक्ष उत्तम संघटक असलेले माधव पाटील तुपदाळकर यांना जिल्हा उपाध्यक्ष पदाचे निवड पत्र देण्यात आले.यावेळी अखिल महाराष्ट्र शिक्षक संघाचे संयुक्त चिटणीस दिलीप देवकांबळे,राज्य उपाध्यक्ष फारूक बेग,राज्य संघटक जयवंत काळे,राज्याचे नेते चंद्रकांत



दामेकर,जिल्हाध्यक्ष संतोष कदम,जिल्हा कोषाध्यक्ष दिपक लोहबंदे,संचालक हाणमंत जोगपेठे,जिल्हा कार्याध्यक्ष प्रविण पाटील,नांदेड पतपेढीचे अध्यक्ष अशोक पवळे,विद्यमान संचालक माणिक कदम संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.माधव पाटील तुपदाळकर यांची जिल्हाउपाध्यक्ष पदी निवड झाल्याने पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कुल मुलींचे मुखेड शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय यलमवाड सह मुख्याध्यापक एस.बी.राजपुत, चंद्रकांत डावकरे, डी.जे.कांबळे,अप्पाराव आवळे,हरी भालेराव,सुधीर श्रृंगारे,पंढरी भालेराव व सर्व क्षिक्षकासह राजकीय सामाजिक पदाधिकार्याने अभिनंदन केले असून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

> **माझ्यावर अखिल महाराष्ट्र शिक्षक संघाच्या राज्य कार्यकारणीने नांदेड जिल्हाउपाध्यक्ष पदाची दिलेली जवाबदारी मी निष्ठेने व प्रामाणिकपने शिक्षक बांधवाच्या अडी अडचनी सोडवन्यासाठी सदैव तत्परतेने संघटनेच्या वतीने सोडवण्याचा प्रयत्न करेन.**
> —माधव पाटील तुपदाळकर
> नुतन जिल्हा उपाध्यक्ष

# माजी राज्यमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांच्या कडून रुग्णासाठी रुग्णवाहिकेची तात्काळ व्यवस्था

## पेरमीलीतील गंभीर रुग्णाला नागपूर एम्समध्ये उपचारा साठी पाठवले; भाजप कार्यकर्त्यांचीही तत्पर साथ

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेवा पवार । गडचिरोली**

अहेरी:- मानवतेचा जिवंत आदर्श पुन्हा एकदा समोर आला असून, अडचणीत सापडलेल्या रुग्णासाठी माजी राज्यमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी तातडीने मदतीचा हात पुढे केला. पेरमीली येथील उमेश बाबुराव तलांडे हे गंभीर आजाराने अहेरी उपजिल्हा रुग्णालयात उपचार घेत होते. मात्र, प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नागपूर येथील एम्स दवाखान्यात हलविणे गरजेचे होते. आर्थिक अडचणींमुळे खासगी वाहनाची व्यवस्था करणे शक्य नसल्याने रुग्ण कुटुंबीय हतबल झाले होते. ही बाब समजताच राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी क्षणाचाही विलंब न लावता रुग्णवाहिकेची व्यवस्था करून दिली. यासोबतच त्यांनी आर्थिक मदतही उपलब्ध करून दिली, ज्यामुळे कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला. या संपूर्ण मदत कार्यात भाजपचे तालुकाध्यक्ष विकास तोडसाम आणि इतर कार्यकर्त्यांनीही तत्परतेने सहभाग घेत रुग्णाला सुरक्षितपणे नागपूरला रवाना करण्यास सहकार्य केले




हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933